लक्ष्मी लॉन्स मंगल कार्यालय
फक्त ५१०००/- रु.
जेवणासह (अटी लागू)
• निसर्गरम्य हवेशिर वातावरण • पाण्याची भरपूर सोय • जेवणासाठी स्वतंत्र हॉल • वधू-वरांना स्वतंत्र रूमसची सोय • २४ तास लाईटची सोय
श्री स्वामी समर्थ सेवा आश्रम ट्रस्ट
अक्कलकोट-सोलापूर एन.एच.रोड, अक्कलकोट
मो. ९३२६१५८१५१ / ८६२५००५१११



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

तमाम जनतेस दसरा व विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा..!



विवाहविषयक
सातारा, सांगली, कोल्हापूर मधील मागासवर्गीय वधूसाठी मोफत नाव नोंदणी व परित्यक्ता, विधवा महिलांसाठी नाव नोंदणी चालू आहे.
संपर्क : ८६८९९३४९९६



सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक ७९ वा | शनिवार, दि. १२ ऑक्टोबर २०२४ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/04/2023-2025 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# सरकारला धडकी भरवणारा आज दसरा मेळावा...




## ९०० एकरचं मैदान, ५०० क्विंटल बुंदी, १०० रुग्णवाहिका अन दहा आयसीयू सज्ज

**जालना (कटूसत्य वृत्त):-** मराठा अरक्षणासंदर्भात राज्य सरकारने अद्याप कोणताही निर्णय घेतला नाही. त्यामुळे मनोज जरांगे पाटील आता मोठ्या आंदोलनाच्या तयारीत आहेत. तसेच आगामी विधानसभा निवडणुकी बाबत देखील जरांगे पाटील मोठी घोषणा करण्याची शक्यता आहे.

दरम्यान, आज बीड येथे नारायण गडावर मनोज जरांगे पाटील दसरा मेळावा घेणार आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी करण्यात आली आहे. मोठ्या प्रमाणात या मेळाव्याला मराठा बांधव उपस्थित राहणार असल्याने, सर्वांच्या नजरा या मेळाव्याकडे लागून राहिल्या आहेत.

**९०० एकरावर होणार मेळावा**

या मेळाव्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तब्बल ९०० एकरावर हा मेळावा होणार असून या मेळव्याचे व्यासपीठ देखील तयार करण्यात आले आहे. येणाऱ्या नागरिकांसाठी २०० एकर परिसरात पार्किंग करण्यात आली आहे. तर तब्बल ५०० क्विंटल बुंदी देखील तयार करण्यात येणार आहे. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन सुरू केले आहे. मराठ्यांना ओबीसीतून आणि सगे सोयरे यांचा समावेश करण्यात यावा या साठी त्यांनी सरकारकडे मागणी केली आहे. मात्र, या संदर्भात अद्याप कोणतीही घोषणा सरकारने केली नाही. त्यामुळे त्यांनी उपोषण देखील सुरू होते. दरम्यान, आज ते पहिला दसरा मेळावा घेणार आहे. बीडच्या नारायण गडावर हा मेळावा आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्याची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. तब्बल ९०० एकरवर हा मेळावा होणार असून या ठिकाणी येणाऱ्यांसाठी पूर्ण व्यवस्था करण्यात आली आहे. सध्या मोठ्या प्रमाणात ऊन पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने देखील या ठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे.

**मनोज जरांगेंच्या भूमिकेकडे लक्ष**

मनोज जरांगे पाटील यांचा हा पहिला दसरा मेळावा राहणार आहे. या मेळाव्यात मनोज जरांगे पाटील काय भूमिका घेणार या कडे सर्वांचे लक्ष लागले आहे. मराठा आरक्षण बाबात ते काय बोलतील तसेच सरकारवर काय टीका करतील? किंवा येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काही राजकीय भूमिका घेणार का अशा अनेक प्रशांची उत्तर आज या मेळाव्यातून मिळणार आहे.

**१० आयसीयू आणि १०० रुग्णवाहिका तैनात**

या दसरा मेळाव्यासाठी मोठ्या प्रमाणात नागरिक येणार आहे. तसेच सध्या ऑक्टोबर महिना सुरू असल्याने वाढते तापमान पाहता नगरिकांच्या आरोग्याच्या दृष्टीने या ठिकाणी १० आयसीयू आणि १०० रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहेत. या माध्यमातून नागरिकांना तातडीने वैद्यकीय सेवा दिली जाणार आहे. तसेच पार्किंगची व्यवस्था देखील करण्यात आली आहे. २०० एकर परिसरात ही पार्किंग व्यवस्था करण्यात आली आहे.

**५०० क्विंटल बुंदीचे होणार वाटप**

जरांगे पाटील यांच्या दासऱ्या मेळाव्यात येणाऱ्या नगरिकांसाठी तब्बल ५०० क्विंटल बुंदीचे वाटप करण्यात येणार आहे. ही बुंदी तयार करण्यात आली असून अनेक जण या साठी झटले आहेत. या बुंदीचे वाटप आज जेवणासह केले जणार आहे. तसेच नागरिकांच्या पाण्याची व्यवस्था देखील करण्यात आली आहे.

## अकलूज मध्ये 2 व 3 डिसेंबर रोजी रयतेचा राजा, राजा शिवछत्रपती महानाट्य



**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवरायांच्या ३५० वा राज्याभिषेक सोहळा वर्षपुर्ती निमीत्त रयतेचा राजा, राजा शिवछत्रपती या महानाटयाचे आयोजन करण्यात येणार आहे. अशी माहिती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील व प्रताप मंडळाच्या अध्यक्षा स्वरूपाराणी मोहिते पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी, सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते पाटील,दीपक खराडे पाटील,शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव अभिजित रणवरे,सह सचिव हर्षवर्धन खराडे पाटील, प्रा.डॉ. विश्वनाथ आवाड उपस्थित होते.

पुढे माहिती देताना संग्रामसिंह मोहिते पाटील म्हणाले की, हे महानाटय विजयसिंह मोहिते पाटील क्रीडा संकुल या ठिकाणी आयोजित केले जाणार आहे.तसेच सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील जयंती समारंभ समिती, शिक्षण प्रसारक मंडळ परिवार अकलूज व सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना कामगार, यांचे संयुक्त विदयमाने या सोहळ्याचे आयोजन करण्यात येणार आहे. असे मोहिते पाटील म्हणाले.

शिवप्रभुच्या कार्यकतृत्वाला मानाचा मुजरा करीत असताना १९७४ साली म्हणजे पन्नास वर्षे आगोदर सहकार महषीर्नी ३०० वा राज्याभिषेक सोहळा आयोजित केलेला होता. तसेच शिवचरित्राची माहीती व्हावी म्हणून बाबासाहेब पुरंदरे यांचे व्याख्यांनाचे दोन महिने आयोजन केलेले होते असेही त्यांनी सांगितले.

तसेच छत्रपती शिवरायांचा आदर्श मानून वाटचाल करणारे जयसिंह शंकरराव मोहिते पाटील यांनी समस्त अकलूजकरांच्या साक्षीने पुरातन किल्याचा जिर्णोध्दार करून मरगळलेल्या मनात उत्साह भरला होता. आजपर्यत शिवाजी महाराजांचे कार्यकतृत्व समाजासमोर मांडण्यासाठी बाळदादांनी जाणता राजा या महानाटयाचे २२ वेळा आयोजन केले. गड आला पण सिंह गेला या लघुनाटयाचे वेळा सादरीकरण केले, छत्रपती शिवरायांच्या जीवनावर आधारीत असलेली शिवश्रृष्टी उभारण्यासाठी महत्वाचे योगदान दिलेले आहे. याशिवाय २०१९ साली रयतेचा राजाः राजा शिवछत्रपती या महानाटयाचे आयोजन केले.


६ जुन २०२२ साली शिवपार्वती मंदिर येथे छत्रपतीं शिवरायांच्या पुतळा पुर्नस्थापना सोहळ्याचे आयोजन केले आहे. तसेच दुर्गभ्रमंती करून गडकिल्यांवर स्वच्छता मोहिम आयोजित केलेल्या आहेत. याशिवाय सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात अनेक उपक्रमांचे आयोजन केलेले आहे. या वर्षी शिवराज्याभिषेक सोहळ्याला ३५० वर्षे पुर्ण होत आहेत त्यानिमीत्ताने पुन्हा एकदा रयतेचा राजा : राजा शिवछत्रपती या महानाटयाचे आयोजन करण्यात येणार आहे असल्याचे संग्रामसिंह मोहिते पाटील व कु. स्वरुपाराणी मोहिते पाटील यांनी सांगितले.


तमाम जनतेस दसरा व विजयादशमीच्या हार्दिक शुभेच्छा...!

श्री लक्ष्मी दुग्धालय
प्रो. रेवणसिद्ध निं. पाटील मो. ८०८७२४९८३६, ९६७३७५७४७७
- शाखा क्र. १ : मंगरुळे हायस्कुल चौक, बायपास रोड, जंगी प्लॉट, अक्कलकोट
- शाखा क्र. २ : मंगरुळे हायस्कुल चौक, टोळ अंबाबाई मंदिराजवळ, अक्कलकोट
- शाखा क्र. ३ : भारत गॅस गोडाऊन शेजारी, स्टेशन रोड, अक्कलकोट
- शाखा क्र. ४ : अक्कलकोट-सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे तोतला फार्म हाऊस शेजारी, अक्कलकोट, जि. सोलापूर
- शाखा क्र. ५ : एस टी स्टॅण्डसमोर, स्वामी कॉम्प्लेक्स, मादनहिप्परगा ता आळंद जि. कलबुर्गी

दुध (गाईचे व म्हशीचे), लोणी (गाईचे व म्हशीचे), तुप (गाईचे व म्हशीचे)
लवकरच आपल्या सेवेत नवीन शाखा
मलईयुक्त ताक, मठ्ठा, लस्सी, बासुंदी, पेढा, दही, श्रीखंड, आम्रखंड, पनीर, खवा, सुगंधी दुध, चक्का, नॅचरल फळयुक्त मँगो रबडी, अंजीर रबडी, पेरू रबडी, स्ट्रॉबेरी रबडी, चिक्कू रबडी, सिताफळ रबडी, काळाद्राक्ष रबडी, जांभूळ रबडी, गुलकंद रबडी व अमूल बटर, चीज ग्रीनपीस, पनीर मसाला, शेंगाचटणी आदी मिळेल.
अक्कलकोट - सोलापूर महामार्ग, ब्यागेहळ्ळी फाटाच्यापुढे, तोतला फार्म हाऊस शेजारी, अक्कलकोट, जि. सोलापूर



स्थापना दि. १९/१०/१९९९ - दसरा
समता पतसंस्थेच्या रौप्यमहोत्सवी वर्षानिमित्तसंस्थेचे सभासद, ठेवीदार, कर्जदार व हितचिंतक यांना दसरा व दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!
रौप्य महोत्सव 25
सतत २५ वर्षे आपल्या सेवेत कार्यरत असलेली विश्वासाची शिदोरी घेऊन दमदार वाटचाल...!
प्रमुख पाहुणे

माजी आमदार ॲड. रामहरी रुपनवर
संस्थापक

ॲड. भानुदास राऊत
शुभेच्छुक :
समता इंग्लिश मीडियम स्कूल, नातेपुते
विकासरत्न विजयसिंह मोहिते-पाटील विविध कार्यकारी सेवा सोसायटी, नातेपुते
न्यायमूर्ती बी. जे. कोळसेपाटील सार्वजनिक वाचनालय, नातेपुते
सर्व संस्थांचे चेअरमन व्हा. चेअरमन, संचालक, सेक्रेटरी कर्मचारी
स्थळ:
समता पतसंस्था, दहिगाव रोड, नातेपुते
शनिवार, दि. १२/१०/२४
सकाळी ९.०० वाजता



आपट्याची पाने, झेंडुची फुले,
घेवूनी आली विजयादशमी,
दसऱ्याच्या आज शुभ दिनी,
सुख समृद्धी लाभो तुमच्या जीवनी..
दसरा सणानिमित्त
आपणास व आपल्या परिवारास मंगलमय शुभेच्छा..!
दसरा व विजयादशमी निमित्त हार्दिक शुभेच्छा!

- स्वामी समर्थ दुध संकलन व शीतकरण केंद्र, मानेगाव
- सह्याद्री ॲग्रो दुध संकलन केंद्र, युनिट-१
- महेश कदम बेदाणा नेटिंग व ग्रेडिंग मशीन युनिट-२ मानेगाव-आनंदनगर
'कदम परिवार व धनगर बांधव यांच्या संपूर्ण सहकार्याने व्यवसायात अखंडित कार्यरत'
चेअरमन विलास कदम
मो-7507453391

## संपादकीय

# धुराळा उडणार आहे

विधानसभेचा आखाडा आखला गेला आहे. आता फक्त आतुरता आहे ती प्रत्येक मोरक्यांच्या गटातील उमेदवारांच्या निश्चित जागांची. महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यापासून ते शहरांपर्यंत हलग्यांचा कडकडाट होणार, त्याचबरोबर तुतारीचा निनाद आणि मशालीची धग, अन काँग्रेसच्या हाताची ताकद लवकरच आपल्याला पाहायला मिळणार आहे. एकीकडे महाविकास आघाडी तर दुसरीकडे महायुती आणि त्याचबरोबर त्यांना आव्हान देणारी आरक्षणासाठी टाहो फोडणारी जनता अन त्यांच्यासोबत नवीन आघाडीची घोषणा करणारे संभाजीराजे छत्रपती आणि बच्चू कडू तसेच इतर घटक पक्ष यांनीही नवीन आघाडी स्थापन केल्याची कुजबूज चालू आहे.

यावेळच्या महाराष्ट्राच्या विधानसभेच्या राजकारणात खूप घडामोडी पाहायला मिळणार आहेत. कारण विरोधी पक्षांनी सत्ताधार्यांना अनेक गोष्टींवरून शिंगावर घेतलं आहे आणि त्यांच्या काही चुकांमुळे जनतेचा आक्रोशही बळवला आहे. मध्यंतरी छत्रपती शिवरायांच्या पुतळ्याची दुर्घटना घडली, याचं राजकारण झालं पण त्यावेळी कित्येक मराठी माणसांची मन दुखावली गेली.

मग बदलापूरच्या चिमुरडीची घटना असो, अशा कित्येक घटनांवरून विरोधी पक्षाने सत्ताधार्यांना धारेवर तर धरलंच आहे पण या सगळ्यांचे मूळ मात्र विधानसभा आहे. 288 जागांपैकी महायुतीला आणि महाविकास आघाडीला किती जागा लढवता येणार आणि त्यातूनही त्यांच्या असणार्या घटक पक्षांनाही त्यांच्या किती जागा मिळणार आणि विधानसभा निवडणूक किती गाजते हे पाहणे महत्त्वाचे.

**1) महायुती सरकार**

मधल्या काळामध्ये अनेक कल्याणकारी योजना अमलामध्ये आणून जनतेचा कौल आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न सत्ताधार्यांचा चालू आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभा निवडणुका डोळ्यांसमोर ठेवून अनेक योजना राबवल्या. रिक्षाचालकापासून ते लाडक्या बहिणीपर्यंत त्या घराघरात पोहोचविल्या आहेत.

त्याच्यामुळे शिंदे सरकारबद्दल जनतेच्या मनामध्ये प्रेम हे वाढताना दिसून येत आहे. पण यांच्याच काळामध्ये अशा अनेक घटना घडल्या ज्यामुळे त्यांनी जेवढे प्रेम कमावले तेवढेच गमावलेसुद्धा. हेच गमावलेलं प्रेम किंवा कमावलेलं प्रेम विधानसभेच्या उंबरठ्यावर त्यांच्या पदरात कितपत पडेल हेच येत्या काळामध्ये दिसून येईल.

सत्ताधाऱ्यांच्या घरामध्ये मोठ्या भावाची भूमिका निभावत असलेल्या भाजपचे विधानसभेला समोर ठेवून किती आणि कशा जागा आपल्या सहकार्यांना देतोय हे पहावं लागेल. 288 पैकी भाजप किती जागांवर लढेल, अजित पवार आणि मुख्यमंत्री शिंदे यांच्याकडे किती जागांचा कल असेल हेही दिसेल. पण भाजपची पाठराखण करणार्या संघाची भलतीच नाराजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर दिसून आली आहे. त्यांनी समाजमाध्यमांमध्ये त्यांच्याविरोधात वक्तव्यही केलं आहे आणि सत्तेमधल्याच काही लोकांनी त्यांना सोबत घेणं हीच मोठी चूक होती असे जाहीररित्या सांगितले देखील आहे. हे सगळं बघता अजित पवार यांच्या पारड्यात किती जागा पडणार हे बघणं गरजेचं आहे.

दरम्यानच्या काळामध्ये झालेल्या चुकीच्या घटना या सत्ताधार्यांची वाट आडवणार्या असतील का, हे पुढील मुद्द्यांच्या दृष्टिक्षेपात पाहू-

मुद्दा क्रमांक एक : आरक्षणाच्या मुद्द्यावरून मराठा समाजातील नागरिकांवर झालेला लाठीचार्ज

मुद्दा क्रमांक दोन : बेरोजगारी, धार्मिक तेढ, सुशिक्षित बेरोजगारांची वाढती संख्या, पेपर फुटीचे प्रकरण आणि विशेष म्हणजे फोडाफोडीचे राजकारण जे की महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये पहिल्यांदा अवलंब गेलं.

मुद्दा क्रमांक तीन : बदलापूरमधील चिमुरडीवर झालेला लैंगिक अत्याचार असो, त्यानंतर एन्काउंटरमध्ये मारला गेलेला आरोपी असो अथवा छत्रपती शिवरायांच्या पूणार्कृती पुतळ्याची दुर्घटना असो, अशा घटनांवरून जनतेच्या मनामध्ये या सरकारविरुद्ध अनेक प्रश्न तयार झाले आहेत की जे येत्या काळामध्ये सरकारला विचारले जातील. आणखी बर्याच अशा घटना घडल्या आहेत ज्यांचे प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहे.

मुद्दा क्रमांक चार : मनोज जरांगे हे सगळ्यात मोठं आव्हान या सरकार पुढे असणार आहे. कारण, आरक्षणाच्या मुद्द्यावरून त्यांनी सरकारला सळो की पळो करून सोडले आहे. येत्या काळामध्ये अपक्ष म्हणून समाज बांधवांना उभं करून लढवण्याचा इशाराही त्यांनी सरकारला दिला आहे. त्यामुळे मनोज जरांगे हे सरकारला कितपत डोईजड होतात हे पाहणे महत्त्वाचे आहे.

मुद्दा क्रमांक पाच : संभाजीराजे छत्रपती, बच्चू कडू आणि इतर काही घटक पक्ष मिळून तिसरी आघाडी निर्माण करू पाहत आहेत. जर या आघाडीमध्ये जरांगे पाटीलही सहभागी झाले तर मोठं आव्हान सरकार पुढे निर्माण होईल हे मात्र नक्की. वर नमूद केलेल्या अडथळ्यांना पार करून महायुती सरकार 288 पैकी किती जागा पदरामध्ये पाडून घेईल हेही पहावं लागेल.

**2) महाविकास आघाडी**

खरंतर पाच वर्षांपैकी महाविकास आघाडीकडे सत्तेमधला दोन-तीन वर्षांचा कालखंड होता. उद्धव ठाकरे यांचा कार्यकाळ बर्यापैकी करोनाच्या काळात गेला. नैसर्गिक आपत्तीवेळेस त्यांचं कार्य हे महाराष्ट्रातील जनतेच्या मनामध्ये आहे. दुसरीकडे, शरद पवार यांच्यासारखा अनुभवी राजकारणीही त्यांच्या जोडीला आहे. त्याचबरोबर केंद्रस्थानी असलेला काँग्रेसही सोबत आहे. आता यांनीही विधानसभेच्या आखाड्यात उभं राहून महायुती सरकार पुढं दंड थोपटण्याला सुरुवात केली असली तरीही यांच्यामध्ये अनेक मतभेद आहेत.

मग ते जागा वाटपाबाबत असोत किंवा राजकीय अजेंड्याबद्दल असोत, हे वेळोवेळी जाणून येते. महाविकास आघाडीमध्ये मुख्य भूमिका निभावणारे तीन धुरंधर म्हणजे शरद पवार, नाना पटोले आणि उद्धव ठाकरे यांच्यात विधानसभेला समोर ठेवून जागा वाटपाबाबत अनेक वेळेस चर्चा झाली आहे. मध्यंतरी राहुल गांधी हे पतंगराव कदम यांच्या पुतळ्याच्या आनावरणासाठी महाराष्ट्रात आले होते.

तेव्हा त्यांच्याही बोलण्यातून विधानसभेच्या आखाड्यात महाआघाडी भक्कम उभी आहे असं दिसून येत होतं. महाआघाडीमध्येही 288 जागांपैकी त्यांच्या किती सहकाऱ्यांना किती जागा मिळणार हे अजून निश्चित झालं नसलं, तरी मोठा भाऊ म्हणून काँग्रेस नक्कीच काही जास्त जागा घेईल असं अनेक राजकीय विश्लेषकांना वाटतं.

महाविकास आघाडी सत्तेमध्ये येण्याची संधी आहे. मधल्या काळात त्यांनी सत्ताधाऱ्यांना अनेक प्रश्नांवरून जेरीस आणलं होतं. महाविकास आघाडी सत्तेमध्ये येण्याची काही कारणे आहेत जे राजकीय विश्लेषकांच्या माध्यमातून सतत कानावर पडत असतात. ते पुढीलप्रमाणे नमूद करता येईल-

**मुद्दा क्रमांक एक :** लोकसभेच्या निवडणुकीमध्ये संविधानाचा मुद्दा खूप गाजला. त्याचप्रमाणे सत्ताधार्यांनी सत्तेमध्ये येताना 50 कोटी घेऊन आले आहेत, असाही आरोप आघाडीने त्यांच्यावरती केला होता. त्यामुळे त्याही आरोपांची पुन्हा एकदा पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता आहे. ज्यामुळे सत्तेत असणाऱ्या लोकप्रतिनिधींचं खच्चीकरण होईल.

**मुद्दा क्रमांक दोन :** सध्याच्या काळात शिवसेनेप्रती अल्पसंख्याकांचे आकर्षण वाढलं आहे. त्यामुळे त्यांची मतं आघाडीकडं झुकतील.

**मुद्दा क्रमांक तीन :** काँग्रेसप्रणित विचारधारा ही जरी समाजवादी असली तरीही महाविकास आघाडीमध्ये उबाठा असल्यामुळे हिंदुत्वाचा मुद्दाही त्यांच्यासाठी फायद्याचा ठरू शकतो.

**मुद्दा क्रमांक चार :** यशवंतराव चव्हाण यांच्यापासून विलासराव देशमुख यांच्यापर्यंत काँग्रेसच्या विचारधारेतील अनेक मातब्बर मुख्यमंत्री महाराष्ट्राला लाभले आहेत. त्यामुळे काँग्रेसची विचारधारा पुन्हा एकदा मूळ धरू शकते, असं मत मल्लिकार्जुन खर्गे यांनी मांडलं आहे.

अशी अनेक सकारात्मक व नकारात्मक मते राजकीय विश्लेषकांची महाविकास आघाडी व महायुती सरकारबद्दल आहेत. पण हे सगळं बघता कोणाच्या पदरात किती जागा पडतील आणि विधानसभेच्या राजकीय आखाड्यात कोण कुणाला चित्तपट करेल किंवा दोघात तिसरा म्हणून तिसरी आघाडी लीड घेईल का? हे येत्या काळात कळेलच. यामुळे जनता या विधानसभा निवडणुकीत लोकशाहीचा हक्क बजावताना कोणत्या निकषांवर कोणत्या पक्षाला सत्तेवर आणते हे भविष्यात कळेलच.

प्रबोधन

# सद्भावाचे सोने । टिके चिरकाल

नुकताच झालेला दसरा हा सण नेमका कोणाचा आहे? स्त्रियांचा की पुरुषांचा? भट भिक्षुकांचा की शूरवीर क्षत्रियांचा? सीमोल्लंघन करून शेजारच्या प्रांताची लूट करणाऱ्या लुटारूंचा की, आणलेलं सोनं आप्तेष्टांना, शेजार-पाजाऱ्यांना, मित्रमंडळींना मुक्तहस्ते वाटून टाकणाऱ्या कर्णावतारी उदार पुरुषांचा? रूढीप्रिय सनातन्यांचा की रूढींचा नाश करून नवमानवधर्म प्रस्थापित करा असं म्हणणाऱ्या सुधारकांचा? विद्यमान भारतीय सणांमध्ये सर्वाधिक ज्येष्ठ असणाऱ्या दसरा या सणाच्या संदर्भात हे सारेच प्रश्न खरे आहेत; आणि त्यांची उत्तरंही खरी आहेत. ही सारी किमया काळाची म्हणून त्याला शहाणी माणसं कालाय तस्मै नमः असं म्हणून हात जोडतात.

या उत्सवाचा प्रारंभ आर्यपूर्वकालीन भारतात मातांचा आदर करण्यासाठी झाला. नऊ दिवस मातृदेवतांचं गुणगान, कौतुक, त्यांचा सत्कार, त्यांचा गौरव परिवारातील सर्व माणसं प्रेमाने, अत्यादराने, कृतज्ञतेने ओथंबलेल्या मनाने करीत असत. अनार्य संस्कृतीच्या प्रगल्भ मानसिक श्रेष्ठतेचं प्रतीक असलेला हा मातृगौरवोत्सव, आदिशक्ती म्हणून मातांचं केलं जाणारं पूजन समाजमनाच्या उत्कृष्ट घडणीचं दर्शन घडवणारं निश्चितच होतं. पण आर्यांच्या भारतावरील आक्रमणाने ही परंपरा खंडित झाली. दोन संस्कृतींच्या सरमिसळीत आक्रमक आर्यांनी पूज्य मातांचा महिमा शून्यावर आणला. मातांसह सर्व स्त्रियांना माजघराच्या अंधारात ढकलून, त्यावर कडी म्हणून मनुस्मृती लिहून ना स्त्रीस्वातंत्र्यमर्हति अर्थात, स्त्रिया जन्माच्या गुलामच असतात, हा विचार समाज मनावर दृढमूल केला. मातृगौरव मागे पडला, पण त्यामुळे त्याचं महत्त्व कमी होत नाही. डॉ. तारा भवाळकर म्हणतात, 'सर्व मानवी जीवनाची हमी स्त्रीदेवता देतात, अशी श्रद्धा मानवी संस्कृतीच्या आदिपवार्पासून सर्व संस्कृतीत स्त्रीदेवता या पृथ्वीवरील आद्यदेवता आहेत.' पण आर्यांनी मातृसत्ताक समाजाचं पुरुषप्रधान संस्कृतीत रूपांतर घडवलं. शांतताप्रिय अनार्यांवर शस्त्रपूजेसारखे समाजविघातक प्रकार लादले. त्यांनी रूढ कलेलं सीमोल्लंघन हे अनार्यांचे प्रदेश बळकावण्यासाठी असत.

या बदलातूनच शक्तीपूजा, शस्त्रपूजा आणि सीमोल्लंघन रूढ होऊन दसरा महापर्व अस्तित्वात आलं. अनार्य लोक आपल्या पत्नीला गृहलक्ष्मी मानत. आर्यांच्या दृष्टीने मात्र स्त्री ही भोगदासीच राहिली. प्राचीन, आर्यपूर्वकालीन वरदानस्वरूप स्त्रीत्व आर्य संस्कृतीच्या विकृत संसगार्ने शापरूप झालं. संत तुलसीदास, समन्वयवादी. पण तोही म्हणाला, ढोल, गँवार, शूद्र, पशू, नारी। ये सब ताडन के अधिकारी ।। रामचरित्रमानस ग्रंथात सीतेचं दुःख व्यक्त करणारा हा महात्मा स्त्रियांना जनावरांसारखं बदडलं पाहिजें म्हणतो; हा केवढा विरोधाभास !

त्यामानाने आजचा शुभेच्छा आणि सद्भावनांची देवाण-घेवाण करण्याचा संस्कार मनावर ठसवणारा दसरा उत्तमच म्हणायचा! सुखवस्तू समाज मातृगौरवाला फाटा देऊन, रासदांडियाचं स्वरूप देऊन विकृतीला जन्म देत असला, तरी समाजसागरावरील तो एक बुडबुडा आहे. इतरेजन मात्र आपल्या मनावर माणुसकीचे, सहिष्णुतेचे, चांगुलपणाचे, क्षमाशीलतेचे संस्कार दृढ व्हावेत म्हणून दसऱ्याचा मुहूर्त साधत असतील, तर ते योग्यच आहे. मातृपूजनाचं पुनरुज्जीवनही आवश्यक आहे. मातृरूप देवींच्या पुढे प्राण्यांचे बळी देण्याचा शस्त्राघाती प्रकार मांसाहारी आर्यांचा आहे. त्याचा त्याग करायला हरकत नाही. रूढी म्हणून त्यांचं अस्तित्व टिकवणं हे लांच्छनास्पद आहे. दसरा कवितेत गोविंदाग्रज म्हणजे नाटककार राम गणेश गडकरी म्हणतात, चला रूढीवर आता घसरा। टाकूनि सीमा मृत धर्माच्या। दंभाच्या वा अंधपणाच्या। जुनेपणाच्या अहंपणाच्या। सीमोल्लंघन कालचि दसरा॥ गोविंदाग्रजांनी नवमानव-धर्माकडे जाण्यासाठी रूढी आणि परंपरांच्या सीमांचं उल्लंघन करणं आवश्यक आहे असं म्हटलं, पण आपण जर स्वातंत्र्य, समता, बंधुत्व या गुणत्रयींचं चिंतन अहोरात्र केलं नाही, तर खरं सीमोल्लंघन कधीही शक्य नाही. यासाठी लक्षात ठेवा-

नवरात्रपर्व मातृपूजनाचे
कृतज्ञभावाचे चिन्ह होते ॥१
अनार्यांनी दिल श्रेष्ठ हा संस्कार
आर्यांहून थोर निश्चित ते ॥२
मात्रोत्सवा केले विकृत आर्यांनी
शस्त्रपूजेतूनि दिसे तेच ॥३
सोने लुटायचे नसते चांगले
वाटणारे भले मात्र नक्की ॥४
सद्भावाचे सोने, टिके चिरकाल
जेवढे वाटाल तेवढे वाढे ॥५
रुढीच्या सीमांचे करू उलंघन
आणू या उधाण सद्भावाला ॥६
मातृत्वा वंदावे, बंधुत्वा जपावे
दसऱ्याला हवे आज हेच ॥७



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

प्रबोधन

# समाजनिष्ठता । शिकवी दसरा

पर्यावरणप्रेमी बांधवांनी आता पुन्हा आळस झटकून कामाला लागलं पाहिजे. गौरी-गणपती उत्सवाने त्यांना खूप त्रास दिला होता. त्यांनी जमा केलेलं निर्माल्य हजारो टन भरेल इतकं नक्कीच होतं. तेवढं निर्माल्य जर नद्या- नाले, तलाव, विहिरींमध्ये टाकलं गेलं असतं, तर त्याने करोडो लिटर पाणी दूषित झालं असतं. त्या पाण्याची शुद्धता टिकवून मानव समाज आणि प्राणीसृष्टीवर पर्यावरणवाद्यांनी अनंत उपकार केले. पण त्यांचा कुणी गौरव केला नाही; किंवा त्यांची पाठही कुणी थोपटली नाही. निर्माल्य वाहत्या पाण्यातच विसर्जित केलं पाहिजे असा फतवा पुराणमतवाद्यांनी काढला होता आणि पाण्याचं प्रदूषण टाळू पाहणाऱ्यांना शत्रूवत ठरवले होते. पण तरीही पर्यावरणवाद्यांनी जलशुद्धीचा आग्रह सोडला नाही. हेही नसे थोडके! जुना देश, प्राचीन रूढी, जुन्या चालीरीतींचं हजारो वर्षांचं अस्तित्व म्हटल्यावर नव्या-जुन्याचा संघर्ष जमेला धरायचाच असतो. विचारकलहाला जसं भ्यायचं नसतं, तसंच आचारकलहालाही घाबरायचं नसतं.

म्हणूनच पर्यावरणवादी बंधूंनी आता पुन्हा कामाला लागलं पाहिजे. नवरात्र दसरा उत्सवाने संपते. लोक दसऱ्यादिवशी सोनं घ्या, सोन्यासारखे राहा' असं म्हणत; सोनं म्हणून ते आपट्याच्या झाडाची पानं देतात घेतात. त्यासाठी एकट्या महाराष्ट्रात तरी हजारो आपट्याची झाडं तोडली जातील. कवितेच्या भाषेत बोलायचं तर, ती झाडं घटस्थापना झाली की, शेवटच्या घटिका मोजीत असतात. कबीरपुत्र कमाल तर वाऱ्यावर डोलणाऱ्या गवतावर मोहीत होऊन गवत कापून घरी न्यायचंही विसरला. पर्यावरणवाद्यांचा तो आद्य मार्गदर्शक! म्हणून वृक्षमित्रांनी, निसर्गप्रेमींनी ह्या झाडांचा नाश थांबवायला हवा. मात्र त्याआधी आपट्याची पानं वाटण्याचा भ्रम लोकमानसातून दूर केला पाहिजे. लोक दसऱ्यादिवशी समाजात प्रेमाची पेरणी करू पाहातात, सद्भावना- शुभेच्छांची देवाण-घेवाण करतात. ही गोष्ट सोन्याहूनही बहुमोल आहे. मग या व्यवहारात काही तरी दिलं पाहिजे आणि काही तरी घेतलं पाहिजे, अशा रूक्ष व्यवहाराची गरज काय? प्रेमव्यवहारात हा रूक्ष व्यवहार निर्मळ, सोज्वळ मनाला निश्चितच खटकतो.

नाही तरी दसऱ्यादिवशी वाटलेल्या आपट्याच्या पानांची दुसऱ्या दिवशी काय हालत होते? कचऱ्याची भरच ना? 'हे पान माझ्या वडिलांनी दिलं, हे पान माझ्या भावानेनदिलं.' अशी वाक्यं कानांवर कधी पडलीत? एकूण हा सारा व्यवहारच रूक्ष आणि नीरस! हा प्रकार थांबवून, फार तर एकमेकांना आदरपूर्वक अभिवादन करावं, गळाभेट घ्यावी, हस्तांदोलन करावं, वडीलधाऱ्यांच्या पायांना स्पर्शासह नमस्कार करावा. लहान मुलं-बाळं भेटली की, त्यांच्या पाठीवरून हात फिरवावा. मनात प्रेम दाटून आलं की, ते नजरेतून ओसंडू लागतंच. त्याला बाह्योपचारांची, प्रतीकरूप वस्तूंची गरज नसतेच. पण आपल्या मनात जर खरं प्रेम नसेल, तर आपट्याच्या फांदीऐवजी आपट्याचं मुळांसह झाड देऊन तरी काय साधणार? दसरा साजरा करण्यासाठी समाजात प्रेम, आदर, आपुलकी, भावनांचं ऐक्य यांच्या प्रसारासाठी, दृढीकरणासाठी, हे उद्दिष्ट महत्त्वाचं आहे. ते साध्य झालं का, हा प्रश्न आपण स्वतःला विचारला पाहिजे.

राष्ट्रसंत तुकडोजी म्हणतात, ऐसाचि आहे दसरा सण। विजयादशमी उत्साहपूर्ण । त्याने वाढे स्नेहसंघटन। उत्तम गावी ॥ सगळ्यांनी मिळोन मिरवीत जावे। थोर पुरुषांचे गोडवे गावे । पूर्व ऋषींचे कौतुक करावे। गौरवावे राष्ट्रासी ॥ ते दिनी उत्तम संकल्प करावा। 'आपुले ते सर्वांचे' हा बोध घ्यावा। मतभेद समूळचि विसरावा। सोने देवोनि एकमेका ।।

दसरा हा सीमोल्लंघनाचा संस्कार रुजवण्याचा प्रयत्न करण्याचा संदेश देत असतो. काळाने ज्या रीतीरिवाजांना टाकाऊ ठरवलं, त्यांच्या सीमेचं उल्लंघन आपण करायला हवं, नित्य परिवर्तन हा जगण्याचा स्वभाव असतो. मग टाकाऊ जीवनशैलीच्या मयार्दांच्या पलीकडे जायला हवं, जातभावना नष्ट झाली पाहिजे, असं छत्रपती शाहूंना वाटलं, त्यांनी जातिप्रथेचं सीमोल्लंघन करून मराठा-धनगर विवाहसंबंध जुळवला. लोकहितवादी देशमुख स्वतः ब्राह्मण असूनही समाजहिताच्या कळवळ्यापोटी ज्ञातिनिष्ठेचे सीमोल्लंघन करून बहुसंख्य ब्राह्मणेतरांच्या आदराचा विषय होऊन राहिले. बाबा पद्मनजी, रेव्हरंड टिळक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा थोर पुरुषांनी स्वधमार्च सीमोल्लंघन करून जीवनाची इतिकर्तव्यता साधली. महात्मा चार्वाक, गौतम बुद्ध, महात्मा गांधी, महात्मा जोतिबा फुले या सर्वांनी केलेले आचार-विचार-व्यवहार यांचं सीमोल्लंघन जगाला नवमानवतेच्या मागार्ला नेणारं सिद्ध झालंय. दसरा हा असा बहुमोल संदेश देतो. त्यासाठी लक्षात असू द्या-

सुधारका हाती। राष्ट्राचे भविष्य
राष्ट्राचा विकास । तोच करी ॥१
जुन्या बंधनांना जावे ओलांडून
ते सीमोल्लंघन । वास्तविक ॥२
रीती झाल्या जुन्या जुन्या झाल्या चाली
जगण्याची केली । त्यांनी गोची ॥ ३
नव्या पद्धतीने । जगायला शिका
उजळून टाका। आयुष्याला ॥४
निसगार्चे करा । सदा संरक्षण
मानवी जीवन । सुखवाया ॥५
कर्मकांड मुक्ती । हाच आत्मोद्धार
सेवाधर्मावर । असो प्रेम ॥ ६
जीवनाचे सोने । होतसे प्रेमाने
द्यावे आनंदाने । सर्व जगा ॥७
समाजनिष्ठता । शिकवी दसरा
सण हाच खरा । समाजाचा ॥८



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# नातेपुते महाविद्यालयात महिला सुरक्षा जनजागृती विषयी मार्गदर्शन



**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** नातेपुते येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालयात महिला तक्रार निवारण समिती आय सी सी राष्ट्रीय सेवा योजना एन एस एस व आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सुरक्षा जनजागृती विषयी विद्यार्थी व विद्यार्थिनी यांना मार्गदर्शन करण्यात आले सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नातेपुते पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे, कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.रज्जाक शेख, तसेच महिला पोलीस कर्मचारी सारिका देशमुख वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल सुधीर हांगे हे मान्यवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते. यावेळी नातेपुते पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक महारुद्र परजणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शालेय जीवनात विद्यार्थ्यांची एक चुक त्याचे आयुष्य उध्वस्त करते. आपले आई-वडील आपल्यावर विश्वास ठेवून शिक्षण घेण्यासाठी पाठवत असतात त्याच विश्वासाने विद्यार्थ्यांनी शिक्षण घेतले पाहिजे. मुलींची होणारी छेडछाड थांबविण्यासाठी पोलीस दीदी व पोलीस काका पथक यांची नेमणूक करण्यात आली आहे. कोरोनामुळे विद्यार्थ्यांच्या हातात शिक्षणासाठी मोबाईल आला परंतु त्याचा दुरुपयोग झाला. विद्यार्थ्यांनी सोशल मीडियाचा वापर चांगल्या गुणांसाठी केला पाहिजे. विद्यार्थ्यांनी कायद्याचे नियम पाळले पाहिजेत ज्या शिक्षणासाठी आपण महाविद्यालयात येतो त्या शिक्षणाचा हेतू साध्य झाला पाहिजे असल्याचे मत महारुद्र परजणे यांनी व्यक्त करून विद्यार्थिनींना महिला सुरक्षा जनजागृती विषयी व्याख्यान दिले. वाहतूक पोलीस कॉन्स्टेबल सुधीर हांगे यांनी वाहतुकीच्या नियमांविषयी माहिती सांगून वाहतुकीचे नियम मोडल्यास त्यावर होणारी कारवाई व होणाऱ्या दंडा विषयी माहिती दिली. महिला पोलीस कॉन्स्टेबल सारिका देशमुख यांनी महिलांवरती होणारे अत्याचार सहन न करता अन्याय करणाऱ्या विरोधात आवाज उठविला पाहिजे. होणाऱ्या छेडछाडीविरुद्ध वेळीच पोलिसांना सांगितले पाहिजे. व कोणत्याही अत्याचाराला बळी पडले नाही पाहिजे याची दक्षता विद्यार्थिनींनी घेतली पाहिजे. यावेळी कार्यक्रमासाठी प्रा. उत्तम सावंत, प्रा. जगदीशचंद्र मुळीक,प्रा. डॉ. सुनिता सुर्यवंशी, प्रा.एस.एच. पवार, प्रा.डॉ.डी.एस. थोरात, प्रा. डॉ. संभाजी बनसोडे. प्रा.विवेक गावडी तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी उपस्थित होते. कार्यक्रमाची प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनीता सूर्यवंशी यांनी केले सूत्रसंचालन प्रा.उत्तम सावंत यांनी केले असून कार्यक्रमाचे आभार प्रा.डॉ.संभाजी बनसोडे यांनी मानले.

सध्या समाजामध्ये अनेक प्रकारच्या घटना घडत असताना आपण पाहतो समाजामध्ये गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे याच्या पाठीमागची कारणे म्हणजे समाजामध्ये नैतिक व नीतिमूल्य लोप पावत चालला आहे माणसांची भौतिक प्रगती होत चालली तसतसे मूल्य आणि संस्कार लोप पावत चालले सरकार सर्व काही करत आहे परंतु शाळा व महाविद्यालयांमध्ये चांगले शिक्षक भरती करायला पाहिजे ते गेल्या पंधरा वषार्पासून भरती केले गेले नाहीत त्यामुळे विनाअनुदानित व तासिका तत्त्वावरचे शिक्षक यांना विद्यार्थ्यांचे काही देणे घेणे नसते. ते विद्यार्थ्यांना शिकवतात निघून जातात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत बसत नाहीत. त्यामुळे या सर्व बाबींना आपली सिस्टीम जबाबदार आहे त्यामुळे गुन्हेगारीचे प्रमाण वाढत चालले आहे हे समाजासाठी देशाच्या विकासासाठी घातक आहे.

**- प्राचार्य डॉ.रज्जाक शेख**
सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील महाविद्यालय नातेपुते

# स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी अंतर्गत विविध कोर्सेस सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** केंद्र शासनामार्फत स्वामी समर्थ महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग टेक्नॉलॉजी, सोलापूर या संस्थेच्या या प्रकल्पास दिनांक 20 फेब्रुवारी 2008 ह्या वर्षी केंद्र शासनाच्या निधी योजनेमधून उभारण्यात आले आहे. सदरचा प्रकल्प हा पर्यटन संचालनालय महाराष्ट्र शासन व केंद्र शासन यांच्या संयुक्त विद्यमानातून राबविण्यात आला असून सोलापूर मध्ये राष्ट्रीय हॉटेल मॅनेजमेंट कौन्सिल मान्यता प्राप्त असून, महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग अंतर्गत महाराष्ट्रातील पहिले पर्यटन आणि हॉटेल मॅनेजमेंट क्षेत्रातील कौशल्य व उच्च शिक्षण, प्रशिक्षण देणारी संस्था आहे. सदर प्रकल्प मजरेवाडी सोलापूर येथील सर्वे क्रमांक 160 मधील 5 एकर जागेवर प्रशासकीय आणि शैक्षणिक इमारतीचे काम व हॉटेल मॅनेजमेंट महाविद्यालयासाठी लागणाऱ्या सयंत्रे, उपकरणे इत्यादी काम सर्वार्थाने पुणे करण्यात आले आहे. मुलांचे व मुलींचे वसतिगृहाची सुविधा देखील पुरवण्यात आली आहे.

या संस्थेचे उद्घाटन दिनांक 3 जुलै 2023 रोजी मंगल प्रभात लोढा यांच्या हस्ते व सर्व लोकप्रतिनिधी सोलापूर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्र इन्स्टिट्युट ऑफ हॉटेल मॅनेजमेंट अँड केटरिंग टेक्नॉलॉजी या संस्थेस राष्ट्रीय हॉटेल प्रबंध एवं केटरिंग टेक्नॉलॉजी परिषद यांनी 15 जून 2023 रोजी AFFILIATION दिले आहे.

मुख्य प्रशासकीय इमारतीत विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. महाराष्ट्र शासन पर्यटन विभाग संचलित, हॉटेल मॅनेजमेंट संस्थेमध्ये, हॉटेल मॅनेजमेंट संस्थेमध्ये, हॉटेल मॅनेजमेंट मधील दहावी व बारावी नंतरचे पदवी आणि पदविका कोर्सेससाठी शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी मान्यता देण्यात आली आहे. यासाठी प्रवेश प्रक्रिया ही देखील सुरू झाली आहे.

**डिग्री कोर्सेस-**

बी.एस.सी इन हॉस्पिटॅलिटी ॲडमिनिस्ट्रेशन 3 वर्षासाठी, 12 वी पास कमीत कमी 45 टक्के मार्क्स असणे आवश्यक आहे.

**डिप्लोमा कोर्सेस-**

डिप्लोमा इन फूड प्रोडक्शन - 12 वी पास, डिप्लोमा इन बेकरी अँड कन्फेक्शनरी 12 वी पास, डिप्लोमा इन फूड अँड बेवरेज सर्विस 12 वी पास, सर्व डिप्लोमा कोर्सेस 1.5 वर्षांचे आहेत. प्रथम येणार त्याला प्रवेश मिळेल या तत्वावर थेट प्रवेश दिला जातो.

MSBSVET कोर्सेस थेट प्रवेशासाठी डिप्लोमा इन ट्रॅव्हल अँड टुरिझम मॅनेजमेंट 2 वर्षे 10 वी पास, डिप्लोमा इन हॉटेल ऑपरेटर 2 वर्षे 10 वी पास, सर्टिफिकेट कोर्स इन बेकरी अँड कन्फेक्शनरी 1 वर्षे 10 वी पास पार्ट टाईम, सर्टिफिकेट कोर्स इन फूड अँड बेवरेज सर्विस 6 महीने 10 वी पास पार्ट टाईम, सर्टिफिकेट कोर्स ट्रॅव्हल अँड टुरिझम 6 महीने 10 वी पास पार्ट टाईम, सर्टिफिकेट कोर्स इन बेसिक फुड प्रोडक्शन 6 महीने 8 वी पास पार्ट टाईम तसेच 'SKIL INDIA' कार्यक्रमांतर्गत केंद्र या महाविद्यालयात सुरू करण्यात येते असून, टुरिझम व हॉस्पिटॅलिटी प्रोग्राम लवकरच सुरू करण्यात येत आहेत. सन 2024-25 मध्ये दुसऱ्या वर्षाचे अभ्यासक्रम सुरू झाले असून, सद्यस्थितीत 30 विद्यार्थी प्रशिक्षण घेत आहेत. या संस्थेमुळे मध्य महाराष्ट्र मध्ये एक सर्व सुविधा संपन्न अशी हॉटेल मॅनेजमेंट केटरिंग करिता प्रशिक्षण संस्था उपलब्ध झाली आहे.

तसेच शासन द्वारा मान्य विविध शिक्षण संस्था, आस्थापना यांचे सहयोगाने संस्थेच्या अभ्यासक्रमामध्ये विविध विषयांचा अंतर्भाव, प्रशिक्षण, कार्यक्रम, वेबिनार, सेमिनार, सामाजिक उपक्रम नियोजित केले जात आहेत. या संस्थेकडे टूर करणेकामी व परिसरामध्ये स्वच्छता ठेवणेसाठी सोलापूर महानगरपालिका व पोलिस यंत्रणा यांचीही मदत मिळते आहे. तरी सोलापूर व महाराष्ट्रातील इच्छुक विद्यार्थी विद्याथीर्नींना आवाहन करण्यात येते की, सदर महाविद्यालय सर्व सोयींनी सुसज्ज असून याठिकाणी चालणाऱ्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. त्याचा आपण लाभ घ्यावा.

**वात्रटिका**

**चला लुटालूट करू**

लुटालूटीचे दिवस आले
चला जे हवे ते लुटा...
खुर्चीवर डोळा ठेवून
कोणी सत्तेत मागा वाटा...
आज सोने लुटून घ्यावे
थोडे राजकारण सोडावे...
सण उत्सवा बरोबर थोडे
संस्कृतीला जपावे...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त बायपास मित्र मंडळ, रवि राठी मित्र परिवार तर्फे खिचडी वाटप



**मुर्तीजापुर (कटूसत्य वृत्त):–** धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त नागपूर येथे जाणाऱ्या भाविकांसाठी बायपास मित्र मंडळ तथा रवी राठी मित्रपरिवार यांच्या वतीने खिचडी वाटप करण्यात आली

12 ऑक्टोंबर ला नागपूर येथे मोठ्या संख्येने बौद्ध धर्मीय भाविक नागपूर येथे दीक्षाभूमीवर जात असतात याच भाविकांची सेवा म्हणून राष्ट्रीय महामार्गावरील बायपास वर बायपास मित्र मंडळ तथा रवी राठी मित्रपरिवार यांच्यातर्फे थंड पेय व खिचडीचे वाटप करण्यात आले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पाटी५चे प्रदेश संघटक सचिव रवी राठी यांच्या उपस्थितीत भगवान गौतम बुद्ध यांच्या चरणी नतमस्तक होऊन त्यांना पुष्प अर्पण करून या खिचडी वाटप कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका बाशीर्टाकळी अध्यक्ष सतीश पाटील, रवी गावंडे, धीरज पाटील, सुधीर शेवने भूषण अंभोरे, सागर बर्डे, प्रशांत अंभोरे, सचिन हिवराळे, सौरभ शेंडे, सुरज मानवतकर, आकाश घोडे, पंकज गवई, रोहित मोहोळ, रंजीत मोहोळ, यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम संपन्न झाला.

# बुधवारी पुन्हा हरिहर पेठ परिसरात पुन्हा, दोन गटांमध्ये तुफान राडा



**अकोला (कटूसत्य वृत्त):–** अकोल्यातील हरिहर पेठ येथे दोन दिवसांधी झालेल्या दोन गटातील राडा झाला होता यानंतर पोलिसांनी या प्रकरणात 17 जणांना अटक केली तर 70 जणांवर गुन्हा दाखल केलाय. मात्र यानंतर पोलिसांनी चुकीच्या लोकांना ताब्यात घेतल असल्याचं म्हणत एका गटातील काही महिलांनी पोलीस स्टेशनला घेराव घातला होता. पोलिसांनी या लोकांची समजूत काढून परत पाठवलं होत मात्र काही जणांनी दुसऱ्या गटातील व्यक्तीला मारहाण केल्याचा आरोप करीत दुसऱ्या गटाने जुने शहर पोलीस स्टेशनला आरोपीला अटक करावी या मागणीसाठी घेराव घातला. दोन्ही गटा कडून पोलीस ठाण्याला घेराव घालण्यात आल्याने काही काळ येथे तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. या नंतर पोलिसांनी प्राप्त तक्रारीनुसार आरोपीविरुद्ध गुन्हे दाखल कायार्ची प्रक्रिया सुरू केली. पोलिसांनी गुन्हे दखल करून आरोपीला अटक करण्याचं आश्वासन दिल्यानंतर घेराव घालणारे परतले. जिल्हा पोलीस अधीक्षक बच्चन सिंग, अप्पर पोलीस अधीक्षक अभय डोंगरे, उपविभागीय पोलीस अधिकारी सतीश कुलकर्णी व जुने शहर पोलीस स्टेशनचे ठाणेदार नितीन लेव्हिलकर यांनी शहरातील नागरिकांना आवाहन केले आहे. पोलिसांनी नागरिकांना अफवांवर विश्वास न तेवण्याचे आणि शांततेचं आवाहन केलं आहे.

# पंढरपूर अर्बन बँक व महाराष्ट्र संशोधन उन्नती संस्थेच्या वतीने परिसंवाद मेळावा संपन्न



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):–** गुरुवार दिनांक 10 ऑक्टोबर 2024 रोजी पंढरपूर अर्बन बँकेचे कर्मयोगी सभागृह येथे अमृत या संस्थेचा परिसंवाद मेळावा व बँकेकडे असणाऱ्या अमृत व्याज परतावा कर्ज योजनेचा शुभारंभ सोहळा पार पडला.

महाराष्ट्र राज्य कार्यविस्तार असणारी सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळख असणाऱ्या दि पंढरपुर अर्बन को ऑप बँकेमध्ये महाराष्ट्र शासनाच्या उपक्रम अंतर्गत आण्णासाहेब पाटील, वसंतराव नाईक, महाराष्ट्र राज्य इतर मागास आदी महामंडळांच्या योजना लागू करून व्याज परतावा कर्ज योजनांचा लाभ कर्ज धारकांना होत आहे, त्यामध्येच अमृत या खुल्या प्रवगार्तील घटकांसाठी असणाऱ्या संस्थेच्या माध्यमातून ही बँक कर्ज देण्यास सज्ज झाली आहे. श्रध्येय सुधाकरपंत परिचारक (मोठे मालक) यांच्या जयंती च्या पूर्वसंध्येला याबाबत अमृत व बँक यांच्यामध्ये करार करण्यात आला व प्राथमिक स्वरूपात लाभार्थी यांना बँकेने कर्ज मंजुरीपत्र प्रदान केले.

अमृत चे व्यवस्थापकीय संचालक श्री विजयजी जोशी यांनी अमृत या संस्थेचा कार्यविस्तार व उद्देशिका बाबत उपस्थितांना मार्गदर्शन केले व अमृत अंतर्गत असणाऱ्या 21 विविध योजनांची माहिती सविस्तरपणे देऊन त्यासाठी आवश्यक कागदपत्रे व प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन केले. काही प्रत्यक्ष लाभार्थी यांचे मनोगत ऐकून त्यांना काही अडचणी आल्या का याबाबत माहिती घेतली व उपस्थितांच्या अनेक शंकांचे समाधान केले व काही मागणी आहेत त्याबाबत आपण सकारात्मक विचार करू असे सांगितले. MPSC/UPSC विद्यार्थी यांचेसाठी योजना अशा प्रकारचे सर्व योजना या अत्यंत सहज व सोप्या भाषेत उपस्थितांना समजेल अशा भाषेत त्यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सुरवातीस उद्योजक रतनजी टाटा व बँकेचे माजी चेअरमन श्री गोपाळराव बेणारे यांच्या पत्नी पुष्पाताई बेणारे यांना श्रद्धांजली वाहून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. पंढरपूर बँकेचे सीईओ श्री उमेश विरधे यांनी प्रास्ताविक केले. व्हा.चेअरमन माधुरीताई जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले. सदर कार्यक्रमचे अध्यक्ष पंढरपूर बँकेचे मार्गदर्शक श्री उमेश परिचारक हे होते. ध्रुव अकादमीचे संचालक श्री विनोदजी देशपांडे, बँकेचे सर्व संचालक यांचे प्रमुख उपस्थितीत व खुल्या प्रवगार्तील समाज बांधवांचे उपस्थितीत हा सोहळा यशस्वी पार पडला.

# माढा विधानसभा मतदारसंघातील रस्ते दुरुस्तीसाठी ४.१५ कोटींचा निधी मंजूर – आ. बबनदादा शिंदे



**माढा (कटूसत्य वृत्त):–** माढा विधानसभा मतदारसंघात लेखाशीर्ष ३०५४–२४१९ अंतर्गत रस्ते व पूल परिरक्षण कार्यक्रम अंतर्गत माढा तालुक्यातील ७ रस्त्यांसाठी २ कोटी रुपयांचा निधी व जिल्हा वार्षिक योजना अंतर्गत ३०५४ व ५०५४ योजनेतून १३ रस्त्यांसाठी २ कोटी १५ लाख रुपये निधी असा एकूण ४ कोटी १५ लाख निधी मंजूर झाला असल्याची माहिती आ. बबनराव शिंदे यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती देताना आ. शिंदे म्हणाले, माढा विधानसभा मतदार संघातील माढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातील ग्रामीण भागातील रस्ते मजबुतीकरण करणे तसेच पूल बांधणे या कामासाठी स्थानिक ग्रामस्थ व नागरिकांची मागणी होती. त्यानुसार माढा तालुक्यातील वडशिंगे ते तांदुळवाडी रस्ता (५० लाख), म्हसोबा देवस्थान ते रुई (२५ लाख), महातपूर ते दारफळ रस्ता (२० लाख), बावी ते इसाबाचा मळा रस्ता (२५ लाख). पंढरपूर तालुक्यातील सुस्ते ते बिटरगांव रस्ता ग्रा.मा. ७९ व अजनसोंड ते महारवस्ती रस्ता (५० लाख), तरटगांव–पटवर्धन कुरोली रस्ता (आव्हे–पटवर्धन कुरोली तरटगांव रस्ता) (३० लाख) तसेच माढा तालुक्यातील ३०५४ अंतर्गत तांबवे (टें.) ते मानेवस्ती ते केम–वेणेगांव रस्ता (२० लाख), आलेगांव (खु.) ते गायकवाड वस्ती, बावी ते वाफळे रस्ता, रा.मा. २०३ ते म्हसोबाची वाडी (उपळाई बु.), चव्हाणवाडी ते बेंबळे शिव रस्ता, कुरणवाडी (कुरणखोरा) ते अरण रस्ता (अरणकडून), कदम वस्ती ते केवड–मानेगांव, धानोरे ते तडवळे, विठ्ठलवाडी ते अंजनगांव (खे.) (५ वा मैल) रस्ता, केवड ते अंजनगांव या रस्त्यांसाठी प्रत्येकी १५ लाख, प्रजिमा–१७ ते व्होळे (बु.) लऊळ–सापटणे (भो) रस्ता (२० लाख) पिंपळनेर ते शिराळ (मा.) रस्ता (शिराळकडून) (२० लाख), बेंबळे–अकोले (बु)– सापटणे रस्त्यासाठी २० लाख रुपये निधी मंजूर झाला आहे.

# अन्यथा प्रहारचे पंचायत समितीसमोर हलगीनाद आंदोलन – पंडित साळुंखे



**कुर्डुवाडी (कटूसत्य वृत्त):–** प्रहार शेतकरी संघटनेचे वतीने पंचायत समितीच्या समोर हलगीनाद आंदोलन करणार असल्याचे निवेदन देण्यात आले आहे. माढा तालुक्यातील प्रत्येक गावातील ग्रामसेवक आपल्या कार्यालयीन कामाच्या गावात उपस्थित राहत नसल्याचे दिसून येत आहे.शासनाने सामान्य नागरिकांचे सेवेसाठी नियुक्ती असताना ग्रामसेवक आपल्या मनाने मनमानी पद्धतीने काम करत असल्याचे दिसत आहे. अगोदरच पाच दिवसांचा आठवडा झाला असताना राहिलेल्या पाच दिवसात दोन दिवसच ग्रामसेवक हजर राहत असल्याचे दिसून येते. फोन केला असता फोन उचलत नाहीत, उचलला तर सोलापूरला मीटिंगला आलोय, कुडुर्वाडीला मीटिंगला आलोय अशी उडवा उडवीची उत्तरे दिली जातात. त्यामुळे सामान्य नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. प्रत्येक ग्रामसेवकांना त्या त्या गावात राहणे आवश्यक असताना तसेच कार्यालयीन वेळेत त्या गावात दिवसभर उपस्थित राहणे बंधनकारक असताना ग्रामसेवक सकाळी दहाला येऊन बाराला निघून जातात त्यामुळे सामान्य माणसांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे प्रत्येक गावातील ग्रामसेवकांना त्यांच्या हजेरीसाठी प्रत्येक गावात थंब मशीन बसवण्यात यावे आणि सकाळी आणि संध्याकाळी कार्यालयीन वेळेत दररोज थंब मशीनवर हजेरी व्हावी तसेच जर त्यांना शासकीय कामासाठी बाहेर कुठे जायचे असेल तर त्यांनी हालचाल रजिस्टर वर नोंद करणे बंधनकारक करावे जर कार्यालयीन वेळेत ग्रामसेवक हजर नसतील तर त्यांची त्या दिवसाची बिनपगारी रजा टाकावी अन्यथा प्रहार शेतकरी संघटनेच्या वतीने 14 ऑक्टोंबर रोजी आपल्या कार्यालयासमोर हलगी नाद आंदोलन करण्याचा इशारा प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हा समन्वयक पंडित साळुंके यांनी दिला आहे.

यាप्रसंगी प्रहार शेतकरी संघटनेचे जिल्हा समन्वयक पंडित साळुंके, माढा तालुकाध्यक्ष अमोल केसरे, वंचित माढा तालुकाध्यक्ष जितेंद्र गायकवाड, मोहन गायकवाड, युवराज तांबीले, अमोल सुतकर, भैरवनाथ गाडेकर उपस्थित होते.

# माढ्यात शिवतेजसिंह पाटलांकडून तुतारीचा प्रचार सुरू



**अकलूज (कटूसत्य वृत्त):–** आगामी विधासभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाध्यक्ष शरद पवारांच्या प्रमुख उपस्थितीत पुणे येथे सोलापूर जिल्ह्यातील इच्छुकांच्या मुलाखती पार पडल्या तर दुसरीकडे शिवतेजसिंह मोहिते–पाटील यांनी माढा विधानसभा मतदारसंघात तुतारी चिन्ह असलेल्या एक लाख शालेय वह्याचे वाटपाचे नियोजन करण्यात आले त्याची सुरुवात मतदारसंघातील पंढरपूर तालुक्यातील करकंब येथून शालेय मुलांना तुतारी चिन्ह असलेल्या वह्याचे वाटप करून करण्यात आले.

यावेळेस शिवतेजसिंह मोहिते पाटील म्हणाले की, उद्योग महर्षि उदयसिंह मोहिते पाटील यांच्या जयंती निमित्त माढा विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे तुतारी वाजवणारा माणूस हे चिन्ह घरोघरी पोहचवण्याचा तसेच शालेय विद्यार्थ्यांना अभ्यासासाठी वह्याचे वाटप पूर्ण माढा विधानसभा मतदारसंघात करणार असल्याचे सांगितले.

गत लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार खासदार धैर्यशील मोहिते पाटील यांच्या माढा विधानसभा मतदारसंघातील प्रचार यंत्रणेची धुरा त्यांचे बंधू शिवतेजसिंह मोहिते पाटील यांनी माढा विधानसभा मतदारसंघात राबवली होती तेथून त्यांनी 56000 लिड देखील घेतले होते. सध्या माढा विधानसभेसाठी शिवतेजसिंह मोहिते–पाटील यांचे देखील नाव चर्चेत आहे. निवडणुक लढवण्याची तयारी देखील सुरू असल्याचे बोलले जात आहे त्या दृष्टीनेच पक्षाचे चिन्ह संपूर्ण मतदारसंघात पोहोचावे यासाठी त्यांनी हा कार्यक्रम हाती घेतला आहे असे राजकीय जाणकार सांगत आहेत.

यावेळेस शिवाजी कांबळे, दीपक वाडदेकर, सतीश देशमुख सर, संजय खडके, शरद पांढरे, नागेश वंजारी, रघुनाथ जाधव, डॉक्टर प्रशांत मोरे, सुनील दुधाने, किरण घाडगे, महेंद्र शिंदे, मनोज शिंदे व इतर मान्यवर उपस्थित होते.


## नाम परिवर्तन

मैंने अपना नाम आशाबाई बबन राऊत से बदलकर आशा बबन राऊत रख लिया है ! भविष्य में इस नाम से जाना जाये ! आशा बबन राऊत पुत्री बबन आप्पासाहेब राऊत, ग्रामः– शिरसी, पोस्ट :– लेंडवे चिंचाले, तहसीलः– मंगलवेढा, जिलाः– सोलापूर, (राज्यः– महाराष्ट्र) पि.नं. 413305. Affidavit No :-1243

## NAME IN CHANGE

I hereby declare that my old name BIBISHAN BHANUDAS KADAM has been changed to New Name BIBHISHAN BHANUDAS KADAM In future, he should be known by this name BIBHISHAN BHANUDAS KADAM

## NAME IN CHANGE

I have changed my name from Ashabai Baban Raut to Asha Baban Raut! In future, she should be known by this name Asha Baban Raut, daughter of Baban Aappasaheb Raut, Village: Shirashi, Post: Lendave Chinchale, Tehsil:- Mangalwedha, District:- Solapur, (State:- Maharashtra) Pin.No. 413305. Affidavit No :- 1243

## नावात बदल

मी याद्वारे घोषित करतो की माझे जुने नाव बिबिषण भानुदास कदम हे नवीन नाव बदलून बिभीषण भानुदास कदम असे करण्यात आले आहे, भविष्यात त्यांना बिभीषण भानुदास कदम या नावाने ओळखले जावे.

## नावात बदल

माझे नाव आशाबाई बबन राऊत चे बदलून आशा बबन राऊत ठेवले आहे, भविष्यात मला या नावाने ओळखावे. बबन आप्पासाहेब राऊत यांची मुलगी आशा बबन राऊत. गाव :– शिरसी, पोस्ट :– लड़ेंवे चिंचाळे, तहसील :– मंगळवेढा, जिल्हाः– सोलापूर, (राज्यः– महाराष्ट्र) पि.नं. 413305. Affidavit No :-1243


## NAME IN CHANGE

I hereby declare that my old name ARUNA BIBISHAN KADAM has been changed to New Name ARUNA BIBHISHAN KADAM In future, she should be known by this name ARUNA BIBHISHAN KADAM

## नावात बदल

मी याद्वारे घोषित करते की माझे जुने नाव अरुणा बिबिषण कदम हे नवीन नाव अरुणा बिभीषण कदम असे बदलून भविष्यात तिला अरुणा बिभीषण कदम या नावाने ओळखले जावे.


## कटूसत्य शब्दकोडे क्र. ९६



**उभे शब्द :** १) आईची बहीण २) अंतराळ कक्षेतील वाहन ३) पाच गुणिले सहा ४) राष्ट्रवादीचे संस्थापक ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढतात ती तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) बंडखोर स्वभावाचे नेते–नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन लढाईची पध्दत–गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यापासून बनवितात ते पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्याला वश करण्याचे उपाय–** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा वार २२) फलंदाजाने बनविलेल्या शंभर धावा २३) वस्तूंची संख्या २५) ध्यास, घेतला ** टाकू नये २६) वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे माजी प्रशिक्षक–** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) हस्त, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण–*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती ३७) मुरली, बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

**आडवे शब्द :** १) युपीच्या माजी महिला मुख्यमंत्री, बसपा सुप्रिमो ४) ऐंशीच्या दशकातील एक अभिनेता –*** सिन्हा ५) मुलाचे एक नाव ७) एक (इंग्रजीत) ८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) बोल्टचा साथीदार ११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाची पत्नी १४) शनिवारवाडा या शहरात आहे १५) उडिदाच्या पिठापासून लाटून बनवितात ते १६) शासकीय कर्मचाऱ्यांचा सुट्टीचा दिवस १७) धातूचा बारीक तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) मनाने मजबूत २०) हळू, मंद गतीने २३) मीठ (हिंदीत) २४) चंद्रावर पहिले पाऊल ठेवणारा अंतराळवीर–** आर्मस्ट्राँग २५) उन्हाळ्यात वादळी वाऱ्यासह पडणारा पाऊस २७) बजरंगबलीच्या हातातील आयुध २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक थोर जैन संत ३३) गुलाम, सेवक ३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक ३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात ३८) सागर, दर्या ४०) एक द्विदल कडधान्य ४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

### शब्दकोडे क्र. ९५ चे उत्तर

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| बे | गु | स | रा | य | | ना | ना | प | टो | ले | |
| चा | | र | ज | त | | रा | | र | | ट | प |
| ळी | | ब | क | | गा | य | क | | | र | द |
| स | व | त | | का | र | ण | | | त | | वी |
| | कि | | क | द | | रा | | अ | प | रा | ध |
| फ | ल | | | र | हा | णे | | न | | ज | र |
| र | | ह | म | खा | स | | व | न | वा | स | |
| व | ण | वा | | न | | | सा | स | र | | |
| री | | | म | | स | ला | ह | | सा | ख | र |
| | रा | ज | का | र | ण | | त | न | | प | ण |
| ल | क्ष | | | क्षा | | रा | | ग | दा | | वी |
| | स | त्त | र | | अ | ह | म | द | न | ग | र |


# Classified - छोटी जाहीरात

## यात्रा

उज्जैन, सिहोर, प्रदीप महाराज सह शेगाव, ५ ज्योतिर्लिंग, १८ सप्टेंबर अष्टविनायक, भीमाशंकर, जेजुरी १९ सप्टेंबर, श्रीशैल्य, तिरुपती, रामेश्वर, कन्याकुमारी १० नोव्हेंबर, काशी, अयोध्या २७ नोव्हेंबर
**मल्लिकार्जुन ट्रॅव्हल्स**
९४२२४६०३१९

## विकणे आहे

सोलापूर शहरातील चांगल्या लोकवस्तीतील ST स्टॅन्ड व रेल्वे स्टेशन जवळ आवंतीनगर, शरद पवार शाळेजवळ, लोकमंगल ऑक्सिपार्क, येथील अ विंग मधील ७०४ नंबरचा फ्लॅट विकणे आहे.
**संपर्क:** 9881361260

## पाहिजेत

**फॅब्रिकेशन कामासाठी अनुभवी हुशार कामगार पाहिजे. संपर्क: गणेश स्टील फॅब्रिकेशन ९९२२५२५२३७**

## पाहिजेत

सोलापूरात कामासाठी पाहिजेत. कॉम्प्युटर ऑपरेटर, अकाउंटंट, टेलीकॉलर, मार्केटींग एक्झिक्युटिव्ह, सेल्समन, वर्क फ्रॉम होम डाटा एन्ट्री (लिखाण व टायपिंग काम) उपलबध आहे.
संपर्क: 9591409911 / 9272021110

## निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**
–: संपर्क :–
8083608083
9922646566
8698732109

(सरकार मान्य)

## अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15 सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

## बांधकाम

घर बांधा, सोलापूर महानगर पालिका नियमाप्रमाणे. बांधकाम परवानगी मिळेल. संपर्क: **चेतन अलकुंटे ९५६१४३३३७७**

## लोन

**संपूर्ण महाराष्ट्रात सर्व प्रकारचे लोन मिळतील**
**संपर्क: 8689934996**







**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

# देशातील पहिल्या विधी सेवा चिकित्सालयाचे डॉ. वंशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उदघाटन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** समाजातील गोरगरीब व्यक्तीला विशेषता महिलांना आणि बालकांना मोफत विधी सेवा व सल्ला दिला जातो. परंतु एखाद्या वैद्यकीय महाविद्यालय व शासकीय रुग्णालयात अशा प्रकारचे विधी सेवा चिकित्सालय सुरू करणारे डॉ. वंशपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महा विद्यालय हे महाराष्ट्रातीलच नव्हे तर देशातील पहिले ठरले असल्याचे मत जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे अध्यक्ष तथा प्रमुख जिल्हा न्यायाधीश मोहम्मद सलीम अजमी यांनी व्यक्त केले.

डॉक्टर वैश्यपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पहिल्या मजल्यावर विकृतीशास्त्र विभागाशेजारी विधी सेवा चिकित्सालय कक्षाच्या उद्घाटन प्रसंगी न्यायमूर्ती आजमी हे बोलत होते.

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव तथा न्यायाधीश उमेश देवर्षी यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विधी सेवा चिकित्सालयाची सेवा वैद्यकीय महाविद्यालयात दर शुक्रवारी सकाळी 11 ते 2 या वेळेत महिला विधी सहाय्यक यांच्यामार्फत सुरू राहणार आहे.

पुढे बोलताना न्यायाधीश आजमी म्हणाले की, संविधानाने प्रत्येकाला खूप अधिकार दिलेले आहेत. यामध्ये सर्वसामान्य नागरिक विद्यार्थी महिला यांना त्यांच्या अधिकाराची जाणीव करून देण्याकरिता अशा विधी प्राधिकरणाची गरज आहे. समाजामध्ये शोषण मोठ्या प्रमाणात होत असून, केवळ कायद्याची माहिती नसल्यामुळे असे प्रकार घडत आहेत. अनेक जण आपल्या अधिकाराचा दुरुपयोग करून कनिष्ठथरातील कर्मचाऱ्यांचे शोषण करत आहेत. या त्यांच्या कृत्याला आळा घालण्याकरिता विधी प्राधिकरणाच्या माध्यमातून प्रयत्न केले जाणार आहेत असेही त्यांनी सांगितले.

यावेळी अधिष्ठाता डॉ. संजय ठाकूर म्हणाले की, विधी सेवा चिकित्सालय वैद्यकीय महा विद्यालयात सुरू करून न्यायाधीशानी राज्यातच नव्हे तर देशात सोलापूरचा नावलौकिक वाढविला आहे. दिवसभरच्या कामकाजाचा प्रत्येकाला ट्रेस असतो. तो दूर करण्याकरिता प्रत्येक व्यक्तीने डिस्टर्ब न होता मेडिटेशन, व्यायाम, योगा, संगीत ऐकणे, चांगली झोप घेणे, हास्यविनोद करणे आणि सकस आहार घेणे गरजेचे असल्याचे सांगितले.

या कार्यक्रमास जिल्हा न्यायाधीश कटारिया होणे राणे मुख्य न्याय दंडाधिकारी श्री भंडारी जिल्हा सरकारी वकील प्रदीपसिंह राजपूत महाराष्ट्र व गोवा बार कौन्सलिंग सदस्य श्री मिलिंद थोबडे सोलापूर जिल्हा बार असोसिएशन उपाध्यक्ष शिंदे सचिव अमोल डॉक्टर किंग उपाधिष्ठता डॉक्टर जयकर डॉक्टर जंजाळ डॉक्टर बनसोडे वैद्यकीय अधीक्षक डॉ.संपत्ती तोडकर डॉक्टर औदुंबर मस्के डॉक्टर राजेश चौगुले डॉक्टर अग्रजा चटणीस चिटणीस डॉक्टर सुहास सरवदे व जिल्हा न्यायालयाचे आणि वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिकारी कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. जयश्री खिस्ते यांनी केले तर आभार डॉ. दंतकाळे यांनी मानले.

# सोलापूर जिल्ह्याला ज्वारी पिकाचे 85 हजार मिनिकिट उपलब्ध

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अन्न आणि पोषण सुरक्षा अभियान – पौष्टिक तृणधान्य सन 2024-25 अंतर्गत रब्बी हंगामात ज्वारी पिकाचे मिनिकिट या बाबीचे नियोजन करण्यात आलेले आहे. या करीता चालू वर्षी ज्वारी पिकाचे मिनिकिट 4 किलो प्रति मिनिकिट पॅकींग साईजमध्ये लक्षांक प्राप्त आहे.

ज्वारी मिनिकिटसाठी एका शेतकऱ्याला आवश्यक असणाऱ्या बियाणांचे 4 किलो प्रमाणे एक मिनिकिट लाभ देय असणार आहे. सोलापुर जिल्हयासाठी 85 हजार ४४० मिनिकिट लक्षांक असुन त्यासाठी 3435.20 क्विंटल बियाणे उपलब्ध होणार असुन शेतकऱ्यांनी संबंधित तालुका कृषि अधिकारी, कृषि सहाय्यक यांच्याशी संपर्क साधुन बियाणे उपलब्ध करून घ्यावे. हे बियाणे तालुकास्तरावर उपलब्ध होणार आहे. यामध्ये फुले सुचित्रा व परभणी सुपर मोती या वाणांचा समावेश आहे. तरी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रमाणीत बियाणे घटकाचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी दत्तात्रय गावसाने यांनी केले आहे.

# मराठा समाजसेवा मंडळाचा आजचा सीमोलंघन कार्यक्रम रद्द

## नारायण गडावर जाण्यासाठी सपाटे यांनी केले आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** येथील मराठा समाजसेवा मंडळाचा सीमोलंघन कार्यक्रम रद्द करण्यात आला आहे. मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांच्या दसरा मेळाव्यानिमित्त नारायण गड येथे होणाऱ्या कार्यक्रमासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

**दरवर्षी मराठा समाजसेवा मंडळातर्फे सीमोलंघन**

कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते. गेल्या साठ वर्षांपासून कोरोनाचा अपवाद वगळता अखंडितपणे दसऱ्या दिवशी हा कार्यक्रम साजरा करण्यात येतो. यानिमित्त समाजातील मान्यवरांना शिवतीर्थ पुरस्काराने गौरवण्यात येते. तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाजातील मान्यवर व्यक्तींचाही सन्मान केला जातो. परंतु, यंदा मराठा संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला आरक्षण मिळावे म्हणून नारायणगड येथे उद्या शनिवारी, दसरा मेळावा आयोजित केला आहे. त्यामुळे शहर व जिल्ह्यातील समाज बांधवांनी या मेळाव्यास उपस्थित राहावे म्हणून मराठा समाजसेवा मंडळाचा नियोजित कार्यक्रम रद्द करण्याचा निर्णय मंडळ मंडळाचे अध्यक्ष तथा माजी महापौर मनोहर सपाटे यांनी घेतला असून नारायणगडच्या कार्यक्रमास समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे म्हणून त्यांनी केले आहे.

# NTPC सोलापूरकडून ग्रामीण शाळांमध्ये डिजिटल शिक्षणासाठी संगणक दान



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ग्रामीण भागातील शैक्षणिक पायाभूत सुविधांचा विकास करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल उचलत, ठळढउ सोलापूरने आपल्या कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) उपक्रमाअंतर्गत, सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील सालगर गावातील जिल्हा परिषद शाळेला 10 संगणक आणि एक प्रिंटर दान केले आहे. या उपक्रमामुळे या भागातील तीन जिल्हा परिषद शाळांना फायदा होईल, ज्या मराठी, कन्नड आणि उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांना शिक्षण देतात. शाळेने एकत्र संगणक प्रयोगशाळा स्थापन करण्याचे ध्येय ठेवले आहे, ज्याचा फायदा केवळ या शाळांना नाही तर परिसरातील इतर जिल्हा परिषद शाळांनाही होणार आहे. या योगदानाचे औपचारिक उद्घाटन सोहळ्याला सोलापूर ग्रामीणचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक प्रीतम यवलेकर आणि NTPC सोलापूरचे मुख्य महाव्यवस्थापक तपन कुमार बंद्योपाध्याय उपस्थित होते. आपल्या भाषणात, प्रीतम यवलेकर यांनी NTPC सोलापूरच्या उरफदृष्टिकोनाचे कौतुक केले, आणि ग्रामीण भारतात डिजिटल अंतर कमी करण्यासाठी तंत्रज्ञानाचे महत्त्व सांगितले. "आजच्या जगात तंत्रज्ञानाचा प्रवेश लक्झरी नसून गरज बनला आहे," असे त्यांनी सांगितले, आणि विद्यार्थ्यांना डिजिटल युगात यशस्वी होण्यासाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देण्याचे महत्त्व अधोरेखित केले. NTPC सोलापूरच्या समुदाय सक्षमीकरणाच्या बांधिलकीला पुन्हा एकदा अधोरेखित करताना, तपन कुमार बंद्योपाध्याय म्हणाले, "आमचे ध्येय केवळ वीज निर्माण करणे नाही, तर समुदाय सक्षमीकरण करणे आहे," असे त्यांनी सांगितले आणि शिक्षण हे शाश्वत प्रगतीचे एक महत्त्वाचे आधारस्तंभ असल्याचे अधोरेखित केले. त्यांनी ग्रामीण आणि शहरी भागातील अंतर कमी करण्यासाठी डिजिटलायझेशनचे महत्त्व देखील स्पष्ट केले. "योग्य पायाभूत सुविधा आणि इंटरनेट प्रवेश मिळाल्यास, ग्रामीण विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण मिळू शकते, ज्यामुळे त्यांची क्षमता खुली होईल आणि ते नवीन उंची गाठू शकतील," असे त्यांनी पुढे सांगितले. हा उपक्रम NTPC सोलापूरच्या जबाबदार कॉर्पोरेट नागरीकत्वाच्या व्यापक बांधिलकीचे प्रतिबिंब आहे, तसेच शिक्षणाच्या परिवर्तनशील शक्तीवर त्यांचा विश्वास दर्शवतो. आवश्यक डिजिटल पायाभूत सुविधा पुरवून, NTPC हे सुनिश्चित करत आहे की ग्रामीण विद्यार्थी डिजिटल युगात मागे राहणार नाहीत.

# ज्ञानेश महाराव प्रकरणी राजेश शिरवाडकर याच्यावर गून्हा नोंद करा : संभाजी ब्रिगेड



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** प्रसिद्ध विचारवंत लेखक संपादक ज्ञानेश महाराव यांच्या वर महिलांचा आधार घेऊन दडपशाही केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावे या बाबत चे निवेदन संभाजी ब्रिगेडच्या वतीने सोलापूरचे जिल्हाधिकारी त्यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

काल दिनांक ९ ऑक्टोबर रोजी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हिडीओ द्वारे दक्षिण मध्य मुंबई चे भाजपा अध्यक्ष राजेश शिरवाडकर यांनी काही महिलांसह ज्ञानेश महारावं यांचे घरी जाऊन दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब करून महाराव यांना त्यांनी केलेल्या वक्तव्या बद्दल बळजबरीने दबाव टाकून माफी मागायला लावण्याचा प्रकार घडवून आणला. खरे तर महाराव यांनी जे वक्तव्य केले त्याबद्दल त्यांचे वर गुन्हे सुद्धा दाखल करण्यात आले असताना सुद्धा भाजपा चे राजेश शिरवाडकर आणि काही महिला यांनी ज्ञानेश महाराव यांना बळजबरीने माफी मागायला लावणे हे संविधानाच्या व लोकशाही च्या दृष्टीने अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घालण्याचा प्रकार घडवीला आहे. एकाबाजूला महारावं यांचेवर गुन्हे दाखल करायचे आणि दुसऱ्या बाजूने दडपशाहीच्या मार्गाचा अवलंब करायचा असला प्रकार संभाजी ब्रिगेड व महाराष्ट्रातील विचारवंत पुरोगामी संघटनेच्या माध्यमातून खपवून घेतला जाणार नाही व महाराव यांचेवर दडपशाही व धाकदबाव टाकणाऱ्या राजेश शिरवाडकर व त्यांच्या सोबत असणाऱ्या व्यक्ती वर गुन्हे दाखल करून कारवाई करावी अन्यथा संभाजी ब्रिगेड च्या स्टाईलने योग्य वेळी योग्य धडा शिकवला जाईल असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे

जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम लखन पारशे दिलीप निंबाळकर लखन गायकवाड विकास माने ब्रिज मोहन शेखर चौगुले आधी उपस्थित होते.

# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेहरुनगर सोलापूर येथे जागतिक अंडी दिन साजरा



**दक्षिण सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जागतिक अंडी दिनानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नेहरूनगर या ठिकाणी पशुसंवर्धन विभागामार्फत अंडी वाटप करून व दैनंदिन आहारात अंड्याचे महत्व सांगण्यात आले.

हा कार्यक्रम जर वर्षी ऑक्टोंबर महिन्यातील दुसऱ्या शुक्रवारी पशुसंवर्धन विभागा मार्फत घेतला जातो सदर कार्यक्रमास बालाजी फार्मस बाणेगाव उत्तर सोलापूर चे मालक मि. व्यंकटराव आणि डॉ शिवाजी भोसले यांनी मोफत अंडी देऊन व उपस्थित राहून सहकार्य केले तसेच मा. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त सोलापूर डॉ समीर बोरकर साहेब, मा. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. नवनाथ नरळे साहेब, सहा आयुक्त डॉ अजय सुपे साहेब, सहा. आयुक्त डॉ विशाल येवले साहेब,पशुधन विकास अधिकारी (तांत्रिक ) पशुसंवर्धन विभाग, जिल्हा परिषद सोलापूर डॉ प्रदिप रणवरे साहेब यांनी उपस्थित राहून अंडी दिनानिमित्त अंड्याचे मानवीय आहारातील महत्व सांगितले आणि मुलांना अंडी वाटप करण्यात आले व मार्गदर्शन करण्यात आले आज या निमित्त जिल्हाभर सर्व पशुसंवर्धन विभागातील सर्व अधिकारी कर्मचारी यांनी विविध ठिकाणी अंडी वाटप करून अंड्याचे महत्व लोकांना पटवून देऊन जागतिक अंडी दिनाचा कार्यक्रम साजरा करण्यात आला.

# मौलाना आझाद पॉलिटेक्निक, होटगी येथे विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शनचे आयोजन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मौलाना आझाद पॉलिटेक्निक, होटगी येथे दि.10/10/2024 रोजी ठिक 11.00 वाजता विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून निझामुद्दीन शेख, सामाजिक कार्यकर्ते व अल्पसंख्याक समाजाच्या कल्याणासाठी कार्य करणारे व मार्गदर्शक तसेच अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीसाठी झटनारे व्यक्तीमत्व लाभले सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मौलाना आझाद पॉलिटेक्निक संस्थाचे प्राचार्य शेख एस.एन होते.

कार्यक्रमाची सुरूवात मा. प्राचार्याच्या हस्ते मान्यवराचे स्वागत व शाल व श्रीफळ देऊन करण्यात आला.

निझामुद्दीन शेख यांनी विद्यार्थ्यांना करिअर विषयक मार्गदर्शन करताना जागतिकीकरणाच्या आगमनाने भारतीय अर्थव्यवस्था बाह्य जगासाठी खुली केली आहे. अशामुळे उद्योगांमधली स्पर्धा कडक झाली आहे; त्यामुळे अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना नवीन तंत्रज्ञान आणि अभियांत्रिकी पद्धतींशी परिचित करून बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये नोकरीसाठी तयार होण्याची तात्काळ गरज आहे. कौशल्य निर्माण कार्यक्रमांमध्ये उद्योग आणि शैक्षणिक संस्था एकत्रित करून एक निरोगी वातावरण निर्माण करण्याची गरज आहे. प्रशिक्षण आणि प्लेसमेंटमधील अंतर सामान्यतः शैक्षणिक संस्थेमध्ये दिसून येते आणि या अंतराचा सामना करण्यासाठी, कौशल्य निर्माण कार्यक्रम उद्योगांसह डिझाइन केले जातात. या दृष्टिकोनामुळे उद्योग आणि शैक्षणिक क्षेत्रातील परस्परसंवाद, संबंधित कौशल्ये आणि विद्यार्थ्यांमध्ये नाविन्यपूर्ण विचार वाढण्याची गरज आहे. अशा विविध विषयावर विद्यार्थ्यांना करिअर मार्गदर्शन केले ज्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यातील तयारीवर प्रकाश पडला.

प्राचार्य, शेख एस.एन यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना करिअर मार्गदर्शन आणि प्लेसमेंट युनिटचा स्थापन केले असून त्याचा हेतू प्रामुख्याने विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअर नियोजनात मदत करते आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या आकांक्षा आणि आवडींना दिशा देण्यास मदत करणारी माहिती प्रदान करणे आहे. आमच्या कॉलेजचे प्लेसमेंट युनिट वेळेवर विद्यार्थ्यांना समुपदेशन करतो आणि प्रशिक्षण सत्रे आयोजित करतो ज्यामुळे विद्यार्थ्यांना उद्योगातील सर्वोत्तम आव्हानांशी स्पर्धा करण्याची क्षमता मिळते. आमच्या संस्थेमार्फत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी प्लेसमेंट समन्वयकाद्वारे करिअर समुपदेशन कार्यक्रम वेळोवेळी राबवले जातात तसेच संबंधित क्षेत्रातील नामवंत व्यक्तींची संवादात्मक सत्रे नियमितपणे आयोजित केली जातात जेणे करून या स्पर्धच्या युगात आमचा विद्यार्थी टिकला पाहिजे अशा प्रकारे प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन व समुउपदेशन करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी कार्यक्रम समन्वयक प्रा. मोईन शेख सर यांनी परीश्रम घेतले तसेच कार्यक्रमाचे सुत्रसंचालन राहिला खरादी मॅडम यांनी केले व प्रमुख पाहुण्याची ओळख हिना मॅडम यांनी करून दिली आणि कार्यक्रमास उपस्थित मान्यवारचे व आयोजकांचे, विद्यार्थ्यांचे आभार निता वाघमारे मॅडम यांनी मानले.

# आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेत प्रीती राठोडला सुवर्ण तर शिवराज बोळकोठेला कांस्य पदक

**मंद्रुप (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठच्या आंतरमहाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धेत दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमी मंद्रुपची खेळाडू प्रीती मोहन राठोड हिने ४६ ते ४९ किलो वजनी गटात सलग तिसऱ्यांदा सुवर्णपदक पटकावले. तर शिवराज बोळकोठे याने ५४ ते ५८ वजनी गटात कांस्य पदक मिळवले. सुवर्णपदक विजेती खेळाडू राठोड हिची सोलापूर विद्यापीठ संघात निवड झाली आहे.

मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात या तायक्वांदो स्पर्धा झाल्या. यामध्ये



दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमी मंद्रूपची खेळाडू प्रीती राठोड हिने सुवर्णपदक पटकावले. निवड झालेल्या या खेळाडूला दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमी मंद्रूपचे मुख्य प्रशिक्षक शिवराज मुगळे यांचे मार्गदर्शन लाभले. सोलापूर जिल्हा तायक्वांदो असोसिएशनचे अध्यक्ष आमदार शहाजीबापू पाटील, तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्राचे अध्यक्ष संदीप ओंबासे, प्रमोद दौंडे, नेताजी पवार, दक्षिण सोलापूर तायक्वांदो अकॅडमीचे अध्यक्ष प्रवीण जोडमोटे, रेश्मा राठोड, दिपक धुळखेडे, सचिन कुंभार, सिद्धाराम विजापूरे यांनी अभिनंदन केले. तसेच पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय बार्शी येथे प्रथम वर्षाच्या विध्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न





**बार्शी (कटूसत्य वृत्त):-** कृषि शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी कृषि क्षेत्रात येत असलेले नवनवीन तंत्रज्ञान अभ्यास करून त्याचा वापर शेतकऱ्याच्या फायद्यासाठी करावा तसेच स्पर्धा परीक्षाचा अभ्यास करून आपल्या आई-वडिलांचे नाव मोठे करावे असे अवाहन श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे खजिनदार जयकुमार शितोळे यांनी कर्मवीर डॉ. मामासाहेब जगदाळे कृषि महाविद्यालय बार्शी येथील प्रथम वर्ष विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभप्रसंगी अवाहन केले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर येथील शासकीय घटक कृषितंत्र विद्यालयाचे प्राचार्य डॉ.जे.डी. जाधव, वरिष्ठ संशोधक सहाय्यक जे. बी. पाटील, कृषि विभाग बार्शी चे कृषि पर्यवेक्षक श्री.सयाजी गायकवाड तसेच, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी येथील वनस्पती विकृती विभागाचे सेवानिवृत्त विभाग प्रमुख डॉ.डी .एन पाडुळे हे उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान बोलताना प्रमुख पाहुण्यांनी बदलते हवामान, स्पर्धा परीक्षा व भारताच्या आर्थिक जडणघडणीमध्ये कृषि क्षेत्राचे असलेले योगदान याबद्दल विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांकडून कृषि क्षेत्रामध्ये काही चांगले बदल होतील अशी अपेक्षा व्यक्त केली. या कार्यक्रमाची प्रस्तावना प्राचार्य गलांडे पी.आर. सुत्रसंचालन डॉ.बर्गे एम. एस, व प्रा. घुटके टी.डी. यांनी केली तर पाहुण्यांची ओळख प्रा. बोनगे व्ही. ई.यांनी करून दिली तर आभार प्रदर्शन डॉ.शेंडे एस .एस. यांनी केले.

# सैनिकी मुलांचे वसतिगृह येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावरील पदांची भरती

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखालील सैनिकी मुलांचे वसतिगृह, सोलापूर येथे निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर माळी-01 पद भरावयाचे आहे. माळी पदाचा अनुभव असणाऱ्यास प्राधान्य देण्यात येईल. मानधन रुपए 13089/- प्रतिमहा असेल. माळी पद हे माजी सैनिक प्रवर्गातून भरावयाची असून सोलापूर जिल्हयातील माजी सैनिक यांनी आपले अर्ज सैनिक सेवेची व इतर शैक्षणिक कागदपत्रासह दिनांक 17 ऑक्टोबर 2024 रोजी प्रत्यक्ष या कार्यालयात सादर करावे व सदर पदाकरिता त्याच दिवशी मुलाखती घेण्यात येतील. तरी उमेदवारांनी स्वतःची मुळ कागदपत्रे सोबत आणावीत. सदर पद भरतीसाठी माजी सैनिकांना प्राधान्य देण्यात येईल. माजी सैनिक उपलब्ध न झाल्यास नागरी जीवनातील उमेदवारांचा विचार केला जाईल. तरी सोलापूर जिल्हयातील पात्र व गरजू माजी सैनिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.

# 'सिंहगड' कॉलेजच्या युवक-युवतीने लुटला दांडिया कार्यक्रमाचा आनंद



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** नवरात्रीत सर्वत्र जल्लोषाचे वातावरण आहे. कॉलनी, शाळा, कॉलेज, कार्यालयात नवरात्रीत विशेष कार्यक्रम पार पडत आहेत. असाच कार्यक्रम कॉलेजची सुटी झाल्यानंतर सिंहगड इन्स्टिट्यूटच्या खेळाच्या मैदानावर पार पडला. यात विद्यार्थ्यांनी मनमुराद आनंद लुटला.

इंजिनिअरिंगच्या अभ्यासक्रमात व्यत्यय येऊ नये म्हणून हा कार्यक्रम गुरुवारी कॉलेज तासिका संपल्यानंतर घेण्यात आला. दांडिया कार्यक्रमांसाठी प्रत्येक विभागातून किमान 3 कर्मचारी (पुरुष आणि महिलांचे संयोजन) नियुक्त केली होती. सर्व विभाग प्रमुखांना सूचना दिल्या होत्या. दांडिया कार्यक्रम झाल्यानंतर सुरक्षितपणे कॉलेजच्या बसने घरापर्यंत सोडण्यात आले. दांडिया कार्यक्रम पूर्ण होईपर्यंत या कर्मचाऱ्यांनी महाविद्यालयातच राहून नियोजन केले.

विविध गाण्याच्या संगीताच्या चालीवर विद्यार्थ्यांनी दांडिया खेळला. देवीचा नवरात्रोत्सव भारतातील महाराष्ट्र, उत्तरप्रदेश, बिहार, बंगाल, राजस्थान, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांत साजरा करण्यात येतो. येथे रासगरबा आणि दांडियाचा फिव्हर असतो. हे विद्यार्थ्यांना समजण्यासाठी हा कार्यक्रम घेण्यात आला. दांडियासाठी गुजराथी वेशभूषेचे आकर्षण आणि गुजराथी संगीताची धूम दिसून आली. संस्थेचे सहसचिव संजय नवले, प्राचार्य शंकर नवले, उपप्राचार्य शेखर जगदे यांनीही सहभागी होऊन विद्यार्थ्यांच्या दांडिया कार्यक्रमास प्रोत्साहन दिले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासाचा तणाव कमी व्हावा, तसा तणाव दूर झाल्याचे पाहावयास मिळाले.

डॉ एस आर पाटील, प्रा. एस.एस.पाठक, कार्यशाळा प्रमुख मनोज बाबर, प्रा व्ही एन जोकरे, प्रा.एम.एच.नायकवडी, एस.पी. तापकीरे, प्रा वाय एन बनसोडे , डॉ आर एस साठे, प्रा.पी पी वायचळ, प्रा एम रमेश, प्रा एम टी शिंदे, प्रो. आर डी चव्हाण, यू.एस. गटकुल, प्रा.एस.एस.शाखापुरे

प्रा.ए.डी.रुईकर , प्रा.के.एस. पाटील प्रा.पी.उ.तोंदळे, प्रा.एस. एस.घाडगे, प्रा. के. एम. मुजावर यांनी परिश्रम घेतले.